# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/06/2023 (बुधवार) दुपार


---

## केळवद पोलीसांची महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची गाडीतुन वाहतुक करणाऱ्या इसमांवर कारवाई

मा. पोलीस अधीक्षक सा. व अपर पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रामीण यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध धंदयावर कारवाई करून अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिले आहेत त्याप्रमाणे अवैध धंदयावर कारवाई करीत असतांना दिनांक २६/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ मौजा सावळी फाटा येथे रात्री नाकाबंदी दरम्यान वाहने चेक करित असता गाडी नंबर क्र. एम एच ३२ सी ९३९५ (पांढऱ्या रंगाची Duster car) ही संशयास्पदरीत्या मिळुन आल्याने तिची पाहणी केली असता सदर गाडीमध्ये **आरोपी नामे– १) विनोद राजेश्वरराव वैरागडे, वय ४८ वर्ष रा. नांदोरी चौक आंबेडकर शाळेजवळ ता. हिंगणघाट जि. वर्धा २) अनिकेत एकनाथ मगरे वय २३ वर्ष रा. चिचघाट ता. हिगणघाट जि. वर्धा, ३) महिला आरोपी** त्यांच्या वाहनामध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थ, सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. त्यामध्ये १) सुगंधित तंबाखु (स्टार मन), प्रत्येकी वजन (कि.ग्रॅ.) ०.५, प्रत्येकी किंमती (रु.) २५०, एकुण नग ४०, एकुण वजन (कि.ग्रॅ.) २०, एकुण किंमती (रु.) १००००/–, २) सुगंधित तंबाखु (गोल्ड) प्रत्येकी वजन (कि.ग्रॅ.) ०.५ ,प्रत्येकी किंमती (रु.) २५०, एकुण नग २०, एकुण वजन (कि. ग्रॅ.) १०, एकुण किंमती (रु.) ५०००/–, ३) सुगंधित तंबाखु (होला) ) प्रत्येकी वजन (कि.ग्रॅ.) ०.२ ,प्रत्येकी किंमती (रु.) १६४, एकुण नग १००, एकुण वजन (कि.ग्रॅ.)२०, एकुण किंमती (रु.) १६४००, ४) सुगंधित तंबाखु (रिमझिम) प्रत्येकी वजन (कि.ग्रॅ.) १, प्रत्येकी किंमती (रु.) ५५० एकुण नग ३०, एकुण वजन (कि.ग्रॅ.)३०, एकुण किमत (रु.) १६५००/–, ५) सुगंधित तंबाखु (ईगल) प्रत्येकी वजन (कि.ग्रॅ.) ०.०४, प्रत्येकी किमत (रु.)६४ एकुण नग ५०० एकुण वजन (कि.ग्रॅ.) २०, एकुण किंमती (रु.) ३२०००/– वरील प्रमाणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण किमंती ७९,९००/–रूपयाचा मुद्देमाल व पांढऱ्या रंगाची डस्टर कार क्र एम. एच ३२ सी. ९३९५ किंमती ४,००,०००/– रूपये असा एकुण ४,७९९००/–रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने त्याबाबत अन्न व औषध प्रशासन विभाग म. रा. नागपूर यांना कळविले असता अन्न व औषध प्रशासन विभाग महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी येवुन कायदेशीर कार्यवाही करून त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलीस स्टेशन केळवद येथे अप. क्र. १५६/२३ कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादवि. सहकलम अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

# घरफोडी

**१) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ११ कि.मी अंतरावरील मौजा जवाहर नवोदय विदयालय नवेगाव खैरी येथील दिनांक ०१/०५/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक २६/०६/२०२३ चे संध्याकाळी १७.१५ वा. दरम्यान दिनांक ०१/०५/२०२३ पासुन शाळेला सुट्टी असल्याने शाळेमधील स्टाफ सुध्दा सुट्टीवर होते. विदयालयातील प्राचार्य यांचे सांगणे वरून मुलीचे डायनींग हॉलमध्ये साफ सफाई करण्याकरीता मेसचे डायनींग हॉलचा मागचा दार तोडुन त्या तुटलेल्या दारामधुन आत प्रवेश करून मेसच्या आतील भितींवर लावलेली ४२ इंचीची बुश कंपनीची एल सी डी टीव्ही किंमती १८,०००/–रू कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– भुषण राजाभाऊ मेश्राम वय ४३ वर्ष रा. जवाहर नवोदय विदयालय नवेगाव खैरी येथील क्वार्टर नं. ४ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ११४२ मो. क्र. ७३५००७१९४१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही :–** अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा कुही येथे दिनांक २६/०६/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक २७/०६/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विष्णु श्रीराम समर्थ, वय ३८ वर्ष, रा. देवळीकला ता. कुही, ह. मु. कुही यांच्या घराच्या रूमचे कुलुप तुटले होते व घरामधील आतील रूममध्ये असलेल्या कपाटातील सामान अस्तव्यस्त पडलेले होते. तेव्हा फिर्यादीने घरी आतील रूममधील लोखंडी कपाटाची पाहणी केली असता कपाटाचा लॉक खुला दिसला व लॉकरमध्ये ठेवलेले जुन्या वापरत्या सोन्याचे दागिने बाबत पाहणी केली असता जर्मनचे डब्यात ठेवलेली कपाटाची चाबी काढुन कपाट चाबीने उघडुन कपाटात ठेवलेले पाच ग्रॅमची अंगठी अंदाजे किंमती १५०००/– रु. सोन्याची पोत अंदाजे ३ ग्रॅम किंमती १२०००/– रु. सोन्याची नथ (मुखडा अंदाजे १ ग्रॅम किंमती ३०००/–रु. ताईत अर्धा ग्रॅम अंदाजे किंमती १५००/–रु रोख रक्कम १५००/– रु असे एकुण ३००००/–रूपयाचा मुद्देमाल घराचा दाराचा कोंडा तोडुन घरामध्ये प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात आरोपींनी चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठमके पो.स्टे. कुही मो नं, ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**